# वार्षिक राशीभविष्य

निसर्ग आणि मनुष्य प्राण्यातील समतोलपणा, न्यायीवृत्ती, रामशास्त्रीबाणा सर्व तऱ्हेचे व्यापार, उद्योग, भरभराटीला आलेली शहरे आणि व्यक्ती, बाजारपेठ यासह अनेक महत्त्वाच्या बाबींवर अंमल करणारी ही रास आहे. या राशीवर सर्व देवता खूष असतात. त्यातही मारुती व देवी यांचा विशेष प्रभाव दिसून येतो. सर्व तऱ्हेचे वायु विकार, किडनी, प्रजोत्पादन इंद्रिये, गर्भारपण, त्वचेचा रंग, आकर्षकपणा तसेच अंगात येण्याचे प्रकार वगैरे याच राशीत अनुभवास येतात. या लोकांना सहसा अन्याय खपत नाही. त्यामुळे कोणावरही अन्याय न करता ते तडजोड करू शकतात. पती-पत्नीतील प्रेम, एकमेकांबद्दल आपुलकी, सोने-नाणे, जड-जवाहीर, कमाईचे साधन, तिजोरी, सरस्वती, लक्ष्मी दत्तगुरु व पितर या सर्वांची कृपा असणारी ही रास आहे. सर्वांना आनंदी करणारी ही रास. म्हणून सणांची राणी दीपावली तीदेखील तूळ राशीतच येते. सर्वत्र आनंदी आनंद निर्माण करणारा सण, वैरागी वृत्तीचा शनिदेखील या राशीत खूष असतो पण जगाच्या पालनकर्त्या सूर्याला ही रास आवडत नाही. चित्रा नक्षत्राचा देखणेपणा व नखरेलपणा, धाडस, प्रेम प्रकरणे, भिन्नलिंगीय आकर्षण, स्वाती नक्षत्राचा थोरपणा, शालीनवृत्ती, मोत्याचे भांडार, विशाखा नक्षत्राचे धाडस, कपटीपणा, लहरीपणा, खोल पाणी, वाघ व म्हशी तसेच बेल, अर्जुन, नागकेशर ही झाडे, महादेव, वायुपुत्र कोणत्याही वास्तुतील आग्नेय कोपरा व स्वयंपाकघर या साऱ्या बाबी याच राशीखाली येतात. वरीलपैकी एखादी गोष्ट जर नसेल तर मनुष्यप्राणी सुरळीत जीवन जगू शकणार नाही. यावर्षी गुरु वर्षभर तिसरा, शनि लाभस्थानी, २८ एप्रिलपर्यंत भाग्यस्थानी कुजस्तंभ, त्यानंतर मंगळ दहावा, राहू महाराज ५ मेपर्यंत पाचवे व त्यानंतर पाताळात, हर्षल वर्षभर वायव्येकडे तसेच २४ एप्रिलपासून दोन महिने हर्षल नेपच्यून युती आणि ऑगस्टमधील दोन ग्रहणे अशी या वर्षाची ग्रहस्थिती आहे. यावर्षी गुरुचे वास्तव्य तृतीयस्थानी आहे. हे ठिकाण गुरुला मानवत नाही. पण तो मुळातच शुभ असल्याने त्याचे कोणतेही अनिष्ट परिणाम जाणवणार नाहीत. त्याची दृष्टी जेथे पडेल तेथे शुभ फळ मिळणारच. असा सिद्धांत आहे. त्यामुळे पत्रकार, साहित्य, राजकारण, आरोग्य, भरभराट, लग्न कार्य, भागिदारी व्यवसाय, कौटुंबिक सुधारणा, तीर्थयात्रा, सासरच्या मंडळींचा उत्कर्ष, डिग्री कोर्सेस याबाबतीत हे वर्ष तुम्हाला उत्तम ठरणार आहे. मध्यंतरीच्या काळात वक्री गुरुमुळे काही गंभीर समस्या निर्माण होतील पण त्यातून तारून निघाल. घराण्याची पूर्व पुण्याई असेल तर हे वर्ष तुम्हाला सुवर्णयुगी ठरेल. यावर्षी घरात किंवा तीर्थक्षेत्री जी धार्मिक कृत्ये कराल ती हमखास फळतील. यावर्षी वाहनयोग निश्चित आहे. त्याचप्रमाणे जागेसाठीही प्रयत्न करा. गुरु शनिचा त्रिकोण योग अत्यंत भाग्यवर्धक असून कायमस्वरूपी व जीवनाला वळण देणारी घटना घडवील. एप्रिलपर्यंत कुजस्तंभामुळे गणेशकृपा लाभेल. मशिनरी, कॉम्प्युटर, यंत्रसामग्रीशी संबंध असल्यास यश मिळवाल. मे ते सप्टेंबरदरम्यान रवि, मंगळ, शनि यांचा अशुभ योग होत असल्याने या काळात सर्व तऱ्हेने आजार, अपघात, गंडांतरे, पोलीस केसिस, शत्रुत्व, मानहानी, क्षुल्लक कामासाठी मोठा खर्च, चुकीच्या निदानामुळे शस्त्रक्रियेचे प्रसंग, त्यातून कोर्टकचेऱ्या, बदनामी असे प्रकार घडतील. तूळ रास ही मुळातच सर्वांना सांभाळून घेणारी व न्यायी वृत्तीची असल्याने संकटातून मार्ग निघेल. सुखस्थानी राहूचे आगमन कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करणारे ठरेल. हर्षल व नेपच्युन युतीचा काळ वास्तुच्या दृष्टीने मोठे घोटाळे निर्माण करणारा आहे. कोणाच्या रूपाने वाईट शक्ती घरात शिरतील सांगता येणार नाही. शेती व जनावरे असतील तर जास्त काळजी घ्यावी लागेल. यावर्षी येणारी संकटे आधिभौतिक व मानवनिर्मित असतील. दशमात येणारा केतु इतरांच्या चुकीमुळे नोकरी व्यवसायात खळबळ माजवील. माता-पिता, सासू-सासरे यांच्या बाबतीत २८ मे नंतरचा काळ चांगला नाही. त्यांच्या प्रकृतीची विशेष काळजी घ्यावी लागेल.

संपूर्ण वर्षभर शनिमहाराज लाभस्थानी राहणार असून तुमच्या जीवनाला संपत्तीला कायमस्वरूपी स्थैर्य मिळवून देणारी आहेत. गंभीर व विचारवंत स्वभावाचे नवे स्नेही, मित्रमंडळी लाभतील. त्यांच्याकडून मोठी कामे होतील. ऑगस्ट-सप्टेंबर हा काळ अशुभ आहे. मित्र-मैत्रिणीमुळे संकटात पडाल. वाहन दुरुस्ती व यंत्र सामग्रीसाठी मोठे खर्च करावे लागतील. वक्री शनिच्या कालखंडात दीर्घकाळ रेंगाळलेली मोठी कामे होऊ लागतील. तुम्हाला जर कोणी त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास त्याला शनिच्या रोषाला सामोरे जावे लागेल. शनिची दृष्टी शिक्षण व संततीस्थानी आहे. विलंब, लहरीपणा, आळशीपणा यामुळे शिक्षणात अडथळे येतील. मोबाईल, वाहन व यांत्रिक वस्तू यामुळे मुलांना त्रास होऊ शकेल. शनिची दहावी दृष्टी मृत्यूस्थानी आहे. श्वास अडकणे, घशाचे विकार, मूत्रपिंड विकार, मधुमेह, विषारी व अमली पदार्थ, आम्लपित्त व खाण्यापिण्यात अनियमितपणा यामुळे शारीरिक आजार उद्‌भवतील. मृत्यूस्थानी शनिची




दृष्टी असल्याने ते शुभ ठरत नाही. त्यामुळे व्यसन, फाजील आत्मविश्वास, नको ते धाडस, वाहनाचा अतिवेग अविश्रांत कष्ट, स्फोटके, फटाके, केमिकल्स, गोळीबार दंगली, भूकंप यापासून सावध राहणे आवश्यक आहे. शनि हा न्यायीग्रह आहे. त्याचे कारकत्त्व जोपासल्यास जीवनाचे कल्याण होते व व्यसन वगैरे केल्यास भयानक त्रास व बाधा होऊ शकते ते लक्षात ठेवावे. २४ एप्रिल ते २८ जून दरम्यान यापूर्वी कधीही अनुभवलेल्या नसाल अशा अतर्क्य जगावेगळ्या गोष्टी घडतील. २५ जूननंतर नेपच्युन वक्रगतीने चतुर्थात येईल. त्यानंतर दोन तीन महिने वास्तु खरेदी विक्रीबाबत आपण सावध राहणे योग्य ठरेल. प्लुटो व गुरु यांची मैत्री यावर्षी तुम्हाला बरेच काही देऊन जाईल. थोरामोठ्यांचे येणेजाणे वाढेल. नवे उद्योग व्यवसाय सुरू करू शकाल. कर्तबगारीला नवे प्रोत्साहन मिळेल.

### या वर्षीचे मासवार अंदाज

**जानेवारी-** महिन्याच्या प्रारंभी शुभ घटना घडतील पण सहकाऱ्याची अरेरावी, कुटुंबातील आजारपणा प्रत्येक कामातील अडथळे, मन:शांती मिळेलच असे नाही. वाहन अपघात संभवतो. आर्थिकदृष्ट्या हा महिना जरा सांभाळून राहणे योग्य. खर्च वाढतील त्यामुळे इतर कामावर त्याचा परिणाम होईल. कौटुंबिक बाबतीत शक्यतो आपण मौन धरणे योग्य ठरेल. व्यापारीवर्गाने या महिन्यात गुंतवणूक जपून करावी.

**फेब्रुवारी -** हा महिना कष्टाचा जाईल. भाग्याची साथ मिळणे कठीण आहे. त्यामुळे स्वत:च्या मनाने जे कराल त्यातच यश मिळेल. प्रत्येक काम सावधगिरीने करणे आवश्यक आहे. इतरांसाठी राबताना स्वत:चाही विचार करा अन्यथा कष्ट तुमचे व श्रेय इतरांना असा प्रकार घडेल. आर्थिक बाबतीत हा महिना चांगला असून अनेक मार्गाने धनलाभ होतील.

**मार्च -** या महिन्यात उत्साही व आनंदी राहाल. आरोग्य नीट राहिल्यास चार कामे करू शकाल. आर्थिकबाबतीत हा महिना अनेक बाबतीत चांगला ठरेल. जुनाट वसुली, विम्याचे पैसे येणे, भाडेकरूकडून डिपॉझिट मिळणे, तसेच नोकरीत काही कारणाने अडकलेले पैसे परत मिळणे याचा त्यात समावेश राहील. व्यापारीवर्गाला हा महिना गुंतवणुकीस चांगला आहे. विद्यार्थ्यांनी एकाग्रतेकडे लक्ष द्यावे. गुरु अनुकूल नाही. बेफिकीर राहू नका.

**एप्रिल-** या महिन्यात प्रत्येक गोष्टीत अडथळे जाणवतील. त्यामुळे मन:स्वास्थ्य मिळणार नाही. आर्थिकबाबतीत खर्च व कमाई यांचे प्रमाण व्यस्त राहील अनेक पाहुणे एकाचवेळी आल्याने कामाचा व आर्थिक ताण वाढणार आहे.

**मे -** शुक्र शुभ असल्यामुळे सर्व कामात यश मिळेल. कुटुंबात आर्थिक घटना घडतील. रवि, गुरु शुभ योग. अनेक कामात मोठे यश मिळवून देईल. या महिन्यात महत्त्वाचे ग्रहपालट होत आहेत. जीवनाला निराळी दिशा देणारे योग, घर -वास्तु यांच्याबाबतीत महत्त्वाच्या घटना घडतील. व्यापारीवर्गाने सांभाळून व्यवहार करावेत. विद्यार्थीवर्गाला सुट्टी असली तरी त्यांनी नवनवीन कला शिकण्याचा प्रयत्न करावा त्यात चांगले यश मिळेल.

**जून-** शुभ ग्रहांची चांगली साथ लाभल्याने अनेक महत्त्वाच्या कामात चांगले यश मिळवाल. व्यवसाय वाढतील. महत्त्वाचे करार होतील. मनातील सर्व इच्छा पूर्ण करू शकाल. कोर्टकचेऱ्यात तुमच्या बाजूने निकाल लागेल. पण तुमची बाजू मात्र सत्याची हवी. उच्च शिक्षणासाठी दूर प्रवासाचे योग येतील. नोकरदारांना नव्या जबाबदाऱ्या पण त्या मानाने मिळकत लाभणार नाही. त्यात ग्रहांची भ्रमणे जरा त्रास करण्याची शक्यता उत्तरार्धात सर्व बाबतीत सांभाळावे.

**जुलै -** नोकरी व्यवसायात चांगले यश मिळेल. नोकरी अथवा कामानिमित्त कंपनी खर्चाने प्रवास व त्यातून लाभ होतील. आर्थिकस्थिती उत्तम राहील. अनेकबाबतीत घवघवीत यश देणारे ग्रहमान आहे. शनि, मंगळाचे अशुभ योग, अपघात व इतर बाबतीत त्रासदायक, व्यापारीवर्गाने माल खरेदी करताना काळजी घ्यावी. फसवणूक होण्याची शक्यता राहील.

**ऑगस्ट-** सूर्यग्रहण व चंद्रग्रहणाचा प्रभाव राहील. बाकी सर्वबाबतीत चांगले असले तरी शत्रुपिडा, शारीरिक अस्वास्थ्य, मानसिक बेचैनी यामुळे कामात लक्ष लागणार नाही. उत्तरार्धात शनि, रवि व मंगळ यांचा अशुभ योग. अपघात व गंडांतरे घडतील. कोठे पैसे गुंतविले असतील तर हानीची शक्यता राहील. कितीही रागाचा प्रसंग आला तरी मन शांत ठेवा.

**सप्टेंबर-** रवि, मंगळ, बुध शत्रुपीडा व वाहन अपघात घडवतील. तुमची काहीही चूक नसताना तुम्हाला गोत्यात आणण्याचा प्रयत्न काहीजण करतील. सावध राहावे, नको त्या व्यक्तींचा सहवास तसेच अनाहूत पाहुणे यामुळे जीव मेटाकुटीला येईल. त्यातून काहीजणांचे संबंध कायमचेच बिघडतील. आपल्याला आग, वीज, पाणी, भूकंप यासारख्या नैसर्गिक दुर्घटनेमुळे नुकसान त्यामुळे जबरदस्त मानसिक धक्का बसण्याची शक्यता. प्राणायाम करा.

**ऑक्टोबर -** सर्व बाबतीत चांगले योग. लग्न कार्यात यश. नोकरीसाठी प्रयत्न केलेला असाल तर त्यात काहीही खर्च न करता नोकरी मिळेल. प्रेमप्रकरण असेल तर त्याचे विवाहात रूपांतर होईल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. नवनव्या मार्गाने धनप्रप्ती. अनेक ठिकाणी प्रवास योग, उद्योग, व्यवसायात प्रगतीचे वारे दिसेल. २२ ऑक्टोबरनंतर अपघात व मनस्ताप होईल.

**नोव्हेंबर -** सुरुवातीचा काळ जरा दगदगीचा जाईल. आर्थिक कोंडीचा महिना, विश्वासाची माणसेही अडवणूक करतील. खर्चात वाढ झाल्याने अनेक बाबतीत कुचंबणा. तरुणाईच्या पराक्रमाने माता-पित्यांना अपमानास्पद स्थिती. या महिन्यात कोठेही प्रवास करताना वाहनाची सुस्थिती व ड्रायव्हर योग्य आहे याची खात्री करा. नोकरदारांना सध्याच्या कामाशिवाय अतिरिक्त कामाचा ताण पडेल.

**डिसेंबर-** महिन्याची सुरुवात आनंदी घटनेने होईल. घरात मंगल कार्ये घडतील. चोरी, संशयी वातावरण, प्रेमप्रकरणे, एखादा गौप्यस्फोट यामुळे मानसिक संतुलन बिघडेल. व्यापारीवर्गाने माल घेताना पूर्ण तपासूनच घ्यावा. विद्यार्थ्यांनी अवांतर विषय टाळून अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करणे योग्य ठरेल. नाटक, सिनेमा, स्पर्धा यात भाग घेताना तुमच्या स्वभावाचा कुणी गैरफायदा घेणार नाही, यासाठी जपावे लागेल.

**आनंद एस. मत्तीकोप,**
१८१२-१ ब,केळकर बाग, बेळगाव